कार्यालयीन आदेश क्र. २६९५

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
प्रशासन विभाग
दिनांक : ६/१२/२०२३.

संदर्भ : १) प्रसिध्द् जाहीरात क्र. २/२०२२, दि. १९/०७/२०२२.
२) मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे दि. ०५/१२/२०२३ रोजीची मान्यता.

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड चे आस्थापनेवर कंपनी सेक्रेटरी, ग्रेड पे ४८०० हे पद नव्याने निर्माण करण्यास मा. संचालक मंडळ ठराव क्र. १०, दि. १०/०१/२०२२ ने मान्यता दिलेली आहे. त्यासअनुसरून कार्यालयीन आदेश क्र. १०७९, दि. २१/०७/२०२२ ने कंपनी सेक्रेटरी या पदाची शैक्षणिक पात्रता, ग्रेड पे, पद संख्या निश्चित करणेत आलेली आहे. तद्अनुषंगाने संदर्भ क्र. १ ने प्रसिध्द् केलेल्या जाहीराती मध्ये सदर पदाची शैक्षणिक पात्रता - कोणत्याही शाखेचा पदवीधर, इन्स्टिटयुट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडीया चे असोसिएट (ACS) सदस्य असावेत, एलएलएम-एलएलबी असल्यास प्राधान्य व अनुभव, कंपनी सेक्रेटरी या पदाचा ४ ते ५ वर्षाचा अनुभव, सार्वजनिक वाहतूक क्षेत्रातील कंपनी सेक्रेटरी या पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य अशी आहे.

कंपनी सेक्रेटरी (वेतनश्रेणी ६ वा वेतन आयोग = १५६००-३९१००, ग्रेड पे ४८००, वेतनश्रेणी ७ वा वेतन आयोग = ४४९००-१४२४००) हे पद सरळसेवेने भरणेकामी यापूर्वी संदर्भ क्र. १ ची जाहिरात क्र. २/२०२२, दि. १९/०७/२०२२ दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द् करणेत आली होती.

तथापि प्रशासकीय कारणास्तव प्रस्तुत आदेशान्वये संदर्भ क. १ ची जाहीरात क्र. २/२०२२, दि. १९/०७/२०२२ रदद् करणेत येत आहे.

(डॉ. संजय कोलते, भाप्रसे)
अध्यक्ष व व्यस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

प्रति,

आस्थापना,

सर्व खाते प्रमुख,

सर्व विभाग प्रमुख,

नोटीस बोर्ड,

आयटी विभाग - सदरचा आदेश महामंडळाचे संकेतस्थळावर प्रसिध्द् करावा.